लग्न म्हणजे बस्ता
बस्ता म्हणजे राजेन्द्र
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिद्ध..
बांधिलकी जनहिताची
# नायक
सायं.दैनिक
संपादक : गोरक्षनाथ मदने   कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर । बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग । होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

Sangamner ▪ MAHMAR/2018/75654 ▪ SRP/135/2022-2024 ▪ वर्ष ८ ▪ अंक ६ ▪ ३/५/२०२५ (दैनिक) ▪ किंमत रु.२/- ▪ पाने ४

फक्त फायदाच फायदा!
खरेदीवर पॉइंट पॉइंट्सवर गिफ्ट
राजपाल मध्ये प्रत्येक खरेदीवर पॉइंट मिळवा आणि पॉइंट्स वर गिफ्ट मिळवा
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे MASALE SINCE 1992 चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले
+91 9370584332
www.kothmiremasale.com

## तरुणाच्या धाडसाने सोनसाखळी चोर पकडला!

### संगमनेरातील प्रकार; आरोपी सराईत असल्याचेही स्पष्ट

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गेल्याकाही दिवसांपासून संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दित सोनसाखळी चोरांचा वावर पुन्हा वाढला असून एकामागून एक घटना समोर येत आहेत. रस्त्यावरुन जाणाऱ्या महिलांना लक्ष्य करीत धुमस्टाईल घडणाऱ्या या घटनांमुळे महिलांची सुरक्षा ऐरणीवर आलेली असतानाच संगमनेरातून अतिशय धाडशी वृत्तही समोर आले आहे. जाणताराजा मैदानाजवळ महाराष्ट्र दिनी संध्याकाळी घडलेल्या या घटनेत चोरट्याने मोपेडवरील महिलेचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढताच एकाने त्याचा जवळपास एक किलोमीटर पाठलाग करीत त्याला आडवले. यावेळी जमलेल्या नागरिकांनी त्या चोरट्याला बेदम चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले. त्याच्याकडून हिसकावलेले मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले असून संबंधित महिलेच्या तक्रारीवरुन शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

याबाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदरचा प्रकार गुरुवारी (ता.०१) अत्यंत **(पान ३ वर)**

## शिक्षकाची तक्रार केल्याने ग्रामसभा घेवून पालकांनाच धमक्या!

### कुरकुंडीतील धक्कादायक प्रकार; बळजबरीने माफीनामाही लिहून घेतला




▪ दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी ग्रामीण भारतात राहणाऱ्या शेवटच्या घटकालाही व्यवस्थेत सामावून घेण्यासाठी पंचायतराज व्यवस्था कायम केली. त्या माध्यमातून ग्रामपातळीवरील विकास वेगाने होण्यास मदत झाली. त्यातून हिवरेबाजार सारख्या ग्रामपंचायतींनी आपल्या गावचा सर्वकष विकास साधण्यासह आदर्श गावाची निर्मिती केली. आज हिवरेबाजारकडे देशात रोल मॉडेल म्हणून बघितले जात असताना त्याच जिल्ह्यातील कुरकुंडीच्या ग्रामपंचायतीत घडलेल्या प्रकाराने विरोधाभास निर्माण झाला आहे. या प्रकाराची गांभीर्याने दाखल घेवून प्रशासनाने तत्काळ कारवाईची करण्याची गरज आहे, अन्यथा या गैरकारभाराचे लोण तालुक्यात सर्वत्र पसरण्याचीही भीती आहे.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

प्रत्येक नागरिकाला व्यवस्थेत सामावून घेण्याच्या उदात्त संकल्पनेतून निर्माण झालेल्या ग्रामपंचायतींनी गेल्या चार दशकांत उल्लेखणीय कामगिरी करताना देशाच्या ग्रामीणभागाचा संतुलित विकास साधण्यात महत्वाची भूमिका बजावली आहे. जिल्ह्यातील हिवरेबाजार सारख्या ग्रामपंचायतीच्या पथदर्शी कामाने तर देशासमोर नवा आदर्श निर्माण झाला असताना **(पान ३ वर)**

## श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ओझा

### नूतन पदाधिकाऱ्यांची निवड; आहिरे यांची कार्याध्यक्षपदी निवड



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर शहरातील पत्रकारांचे एकमेव कृतिशील संघटन असलेल्या श्रमिक पत्रकार संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. आगामी वर्षासाठी झालेल्या या निवडींमध्ये संघाच्या अध्यक्षपदी नितिन ओझा, कार्याध्यक्षपदी संजय आहिरे, उपाध्यक्षपदी शेखर पानसरे, सचिवपदी सतीष आहेर व समन्वयकपदी गोरक्षनाथ मदने यांच्यावर सर्वानुमते जबाबदारी सोपवण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांच्या हितासाठी काम करणार असल्याचे सांगितले.

पूर्वीच्या संगमनेर पत्रकार मंच म्हणून लौकीक मिळवलेल्या या संघटनेचे दोन **(पान ३ वर)**

## माजी आमदार अरुण जगताप यांचे निधन!

### पुण्यात घेतला अखेरचा श्वास



**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

अहिल्यानगरचे माजी नगराध्यक्ष व विधानपरिषदेचे दोन टर्म आमदार राहिलेले अरुण बलभीम जगताप (वय ६७) यांचे आज पहाटे दोन वाजता अल्पशा आजाराने पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. तब्बल एक महिना मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात शोककळा **(पान ३ वर)**

## महायुती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र प्रगतीकडे : आ. खताळ



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

महाराष्ट्र ही साधू संतांची आणि महतांची भूमी आहे. त्यांच्या ताकदीमुळेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची देशात वेगळी ओळख निर्माण झाली आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र विकासापासून कधीच थांबणार नाही.तर कायमच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहील असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

शहरातील नगरपालिकेच्या क्रीडा संकुल येथे महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने आमदार अमोल खताळ **(पान ३ वर)**

## देशाच्या विकासात महाराष्ट्राचा मोठा वाटा : माजी मंत्री थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समतेच्या व बंधुभावाच्या विचारांवर काम करणारा महाराष्ट्र हा विकासात देशात अग्रगण्य आहे. मानवता धर्माचा विचार देणाऱ्या महाराष्ट्राचा देशाच्या विकासात मोठा वाटा असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी काढले.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शेतकी संघ **(पान ३ वर)**



JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
अकाउंटंट (एम.कॉम/बी.कॉम) टॅली आवश्यक जीएसटी/बॅलन्स शीट/बॅंकिंग चा अनुभव आवश्यक पगार - 25000/-
सिव्हील इंजिनियर (बी.ई.सिव्हील/डिप्लोमा सिव्हील) अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य पगार 20,000
मार्केटिंग साठी मुले व मुली (एम.बी.ए./ग्रॅज्युएट) पर्सनॅलिटी व मार्केटींगचा अनुभव आवश्यक पगार 20,000/-
इलेक्ट्रिकल इंजिनियर (बी.ई. इलेक्ट्रिकल) आय.टी.आय. इलेक्ट्रिकल कोर्सेस अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य पगार 20,000
साईट सुपरवाईजर स्वतःची टु-व्हिलर आवश्यक
- संपर्क - मो. 9552499399
Teacher for School Urgent Required 1) MA (BEd) English 2) Msc (Physics) 3) Msc (Math)

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
naturearesort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

JOB VACANCY
जागा त्वरित भरणे आहे
कॉम्प्युटर ऑपरेटर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
कॅशिअर (2 जागा) शिक्षण - पदवीधर
सेल्समन/सेल्सगर्ल (4 जागा) शिक्षण-पदवीधर
हेल्पर (2 जागा) 10 वी पास
ड्रायव्हर (1 जागा) ऑटोमॅटिक गाडी चालविता येणे आवश्यक
सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्स • सोने • चांदी • हिरे •
मेनरोड, संगमनेर, जि.अ.नगर shahane jewellers 02425-225642
9118 42 9118/ 98 90 499 699 smsjewellers_sangamner

आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
OM MAYUR JEWELLERS ओम मयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

CHAITANYA HOSPITAL SANGAMNER
चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)

डॉ.नागेश अघोर
किडनी विकार आणि प्रत्यारोपण तज्ञ
अनुभव
मागील १४ वर्षांमध्ये दोन लाखांपेक्षा अधिक डायलिसीस
उत्तर महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक किडनी प्रत्यारोपण
(kidney Transplant) या विभागामध्ये सर्वप्रथम
आंतरराष्ट्रीय रुग्णांचे किडनी प्रत्यारोपण
विरुद्ध रक्तगटाच्या अवयव दात्याकडून किडनी प्रत्यारोपण
यशस्वीरित्या सर्वाधिक रुग्णांमध्ये पार पाडण्याचा विक्रम
किडनी आजारावरील लक्षणे
चेहऱ्यावर आणि पायांवर सूज येणे ▪ लघवी करताना आग होणे/दुखणे
भूक मंदावणे ▪ लघवी लाल रंगाची होणे
श्वास घेण्यास त्रास होणे ▪ मुतखडा (किडनी स्टोन)
लघवीचे प्रमाण कमी होणे
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथ्या बुधवारी

भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क अँड सारीज
• शेरवाणी • कुर्तापायजमा • ब्लेजरसुट • इंडोवेस्टन • पॅन्ट-शर्ट
• पैठणी • घागरा • शालू • कांजीवरम
• प्युअरसिल्क • डिजायनर सारीज् • वनपीस • क्रॉप टॉप
क्षण क्षणांभात शोभा वाढवणारी वस्त्रसंपदा !
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था
शहरातले पहिले संपूर्ण ए.सी. शोरुम
मेनरोड कॉर्नर, 02425 225719
बाजारपेठ, संगमनेर

# संपादकीय

सुविचार : शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## वैभवचा झंझावात

गरज गरज आज मेघ, घनन घनन छायो रे ।
चमक चमक बिजुरी चमके, कहत रे, ऋतुराज आयो रे।

भारत आणि पाकिस्तानच्या आकाशात युद्धाचे ढग 'गरजत' असताना सोमवारी इंडियन प्रीमियर लीगमध्ये जयपूरच्या सवाई मानसिंह स्टेडियमवर १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीच्या बॅटने धावांची बरसात केली. त्याचे शतकी वादळ असे काही घोंघावले की त्याच्या तडाख्यात अनेक जागतिक विक्रम भुईसपाट झाले आणि नवे विक्रम प्रस्थापित झाले. वैभवने आयपीएलच्या इतिहासातील सर्वांत युवा शतकवीर ठरताना ३८ चेंडूंत १०१ धावांची तुफानी खेळी साकारली. आयपीएलमध्ये सर्वाधिक वेगवान शतक वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर आहे. त्याने ३० चेंडूंत शतक ठोकले होते. त्यानंतर ३८ चेंडूंत शतकी मजल मारून भारताच्या युसूफ पठाणने दुसरा क्रमांक पटकावला होता. सोमवारी वैभवने पठाणचा विक्रम खालसा करत अवघ्या ३५ चेंडूंत शतक झळकावले आणि सर्वाधिक वेगवान शतक ठोकणारा पहिला भारतीय ठरला. आपल्या शतकी खेळीत त्याने ७ चौकार आणि ११ षटकार ठोकले. बिहारमध्ये जन्मलेल्या वैभवच्या ओठावर अजून मिसरूड फुटलेले नाही, त्याचे ओठ पिळले तर दूध गळेल की काय अशी स्थिती, चेह–यावर अत्यंत निरागस, निष्पाप असे भाव परंतु या पोराच्या हातात राक्षसी ताकद आहे. त्याच्या बॅटचा झपाटा पाहून गोलंदाजांना तो अतिरेक्यासारखा भासत असेल. यंदाच्या आयपीएलमध्ये 'एक बिहारी, सौ पे भारी' ठरतोय यात शंका नाही. आयपीएलमधील त्याचा हा तिसराच सामना होता. पहिल्या सामन्यात तिसेक धावा काढून वैभव बाद झाला तेव्हा तंबूकडे परतताना त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. गुजरातविरुद्धच्या सामन्यात शतकी खेळी करून तंबूकडे जाताना सुद्धा तो अश्रू गाळत होता, हे अश्रू आनंदाचे असले तरी त्याला थोडी दु:खाची किनार होती. ती यासाठी की शतक झळकल्यानंतर अख्ख्या स्टेडियमने उभे राहून मानवंदना दिली होती, वैभवचे कोच 'द वॉल' राहुल द्रविडही उभे राहून दाद देत होते. उभे राहताना द्रविड थोडेसे अडखळले, कारण त्यांचा पाय फ्रॅक्चर होता. वैभवचे अश्रू त्यासाठी होते. अवघ्या तीन सामन्यांत वैभवने आपल्या बिहार राज्याचे नाव रोशन केले आहे. जनावराचा चारा खाणारे राज्य म्हणून ज्या राज्याची नाचक्की झाली होती, त्या बिहारला अभिमान वाटावा अशी कामगिरी वैभवने करून दाखवली आहे. वैभवच्या वयाबद्दल अनेक जण संशय व्यक्त करतात, तो १४ वर्षांचा नसून २२ वर्षांचा असावा अशी शंकाही व्यक्त करतात. परंतु या वयात त्याने आंतरराष्ट्रीय गोलंदाजांविरुद्ध आपल्या फटक्यातून जे सिलेक्शन आणि टायमिंग दाखवले आहे ते अफलातूनच म्हणावे लागेल. त्याला ती दैवी देणगी आहे असे म्हणावे लागेल. गुजरातविरुद्धच्या सामन्यात पहिल्या चेंडूपासून त्याने आक्रमक धोरण स्वीकारले आणि अवघ्या १७ चेंडूंत अर्धशतकाची वेस ओलांडली. आयपीएलमध्ये अर्धशतक झळकावणारा तो युवा फलंदाज ठरला. नंतर केवळ १८ चेंडूंत त्याने शतकी मजल मारली. आयपीएलमध्ये आंतरराष्ट्रीय गोलंदाजांना तोंड देणे म्हणजे पोरासोराचे काम नाही. नाही तरी १४ वर्षांच्या वयात भारतीय मुलं काय करत असतील? एकतर परीक्षेची तयारी करत असतील, वैभवसारखी शतक ठोकत असतील आणि पाकिस्तानातील मुलं अतिरेकी बनत असतील! म्हणजे हा संस्कार आणि संस्कृतीतील फरक म्हणावा लागेल. सध्या पांढ–या चेंडूच्या क्रिकेटची चलती आहे. मर्यादित षटकांचे, टी–२० क्रिकेट अतिशय लोकप्रिय आहे. युवा भारतीय क्रिकेटपटूंच्या हातात भारतीय क्रिकेटचे 'वैभव' सुरक्षित आहे यात तिळमात्र शंका नाही. डावखुरे युवा क्रिकेटपटू तर अक्षरश: 'छा गये है' असेच म्हणावे लागेल. यशस्वी जयस्वाल, साई सुदर्शन, अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, देवदत्त पडिक्कल, ईशान किशन या तरुणाईने कहर मांडला आहे. टी–२० मध्ये तुमच्या तंत्राला महत्त्व नाही, तुम्ही कशा आणि किती धावा काढता याला अधिक महत्त्व आहे. त्यामुळे काही जण या क्रिकेट प्रकाराला नाके मुरडतात. परंतु आजच्या धावत्या जगात चमत्काराला नमस्कार करतात.. त्यामुळे नाइलाजाने का होईना आपल्याला नमस्कार करावा लागतोच. भारतीय क्रिकेटच्या क्षितिजावर एक नवा तारा उदयास आला आहे, त्याचे नाव वैभव सूर्यवंशी. १४ वर्षांच्या वैभवने क्रिकेटच्या मैदानावर अशी काही जादू दाखवली की सध्या क्रिकेट विश्वात त्याच्याच नावाची चर्चा आहे. बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यातील ताजपूर गावात एका शेतकरी कुटुंबात वैभवचा जन्म झाला. अवघ्या चौथ्या वर्षापासूनच त्याला क्रिकेटचे वेड लागले. वडील संजीव सूर्यवंशी यांनी त्याच्या क्रिकेटच्या स्वप्नांना पंख दिले. कुटुंबाने आर्थिक अडचणींना तोंड देताना वेळप्रसंगी जमीनही विकली, पण वैभवच्या प्रतिभेला खुलवण्यासाठी त्यांनी कधीच माघार घेतली नाही. वैभवने स्थानिक क्रिकेटमध्ये चमक दाखवली. वयाच्या १२ व्या वर्षी रणजी ट्रॉफीत तर १३ व्या वर्षी विजय हजारे ट्रॉफीत पदार्पण केले. आयपीएल २०२५च्या लिलावात राजस्थान रॉयल्सने त्याला १ कोटी १० लाख रुपये खर्चून आपल्या ताफ्यात सामील केले तेव्हा तो आयपीएल करार मिळवणारा सर्वांत कमी वयाचा (१३ वर्षे) खेळाडू ठरला. वैभवने आयपीएलच्या पदार्पणात लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला आणि गुजरात टायटन्सविरुद्धच्या आपल्या तिस–याच सामन्यात शतकी मजल मारताना राशीद खानच्या चेंडूवर षटकार मारला. वैभवच्या शतकी खेळीचे कौतुक गुजरातच्या खेळाडूंनीसुद्धा केले. वैभवकडे अफाट प्रतिभा आहे, आता त्याने दीर्घकालीन करिअरवर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याच्यावर अपेक्षांचा दबाव आहे पण मानसिक ताकद आणि प्रतिभेच्या जोरावर त्याला दबाव झुगारून देता येईल. वैभवचे कौतुक करताना मास्टर ब्लास्टर म्हणतो– वैभवचा निडर दृष्टिकोन, बॅट स्विंग, चेंडूचा टप्पा साधण्याचे कसब आणि चेंडू ठोकताना लावलेली ताकद, त्याच्या सुंदर खेळीचा मंत्र होता. 'गरज गरज आज मेघ'च्या शेवटच्या ओळीत थोडासा बदल करून म्हणता येईल– 'कहत रे, वैभव आयो रे'!

## कमी टेरीफ, जास्त संधी; पण...

> अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या टेरीफ शुल्कयादीत फिलिपीन्स वगळता संपूर्ण आशियातील इतर उभरत्या बाजारपेठांच्या तुलनेत भारतावर सर्वात कमी टेरीफ लागू आहे. त्यामुळे भारताला जागतिक व्यापार आणि उत्पादन क्षेत्रात आपली स्थिती भक्कम करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात भारताची निर्यात अमेरिकन बाजारात अधिक बळकट होण्याची शक्यता आहे. याचे कारण प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स निर्यातक देशांच्या तुलनेत भारतावर कमी टेरीफ आकारले गेले आहेत. चीन व व्हिएतनामच्या तुलनेत भारत सध्या अधिक अनुकूल स्थितीत आहे. याचा लाभ भारत घेणार का?

■ **डॉ. जयंतीलाल भंडारी,** अर्थतज्ज्ञ



अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी लादलेल्या टेरीफ धोरणांच्या पार्श्वभूमीवर भारत अमेरिका आणि इतर प्रमुख राष्ट्रांबरोबर द्विपक्षीय व मुक्त व्यापार करार करण्याच्या दिशेने प्रगती करत आहे. यामुळे संकटात संधी शोधण्याचे कौशल्य भारताच्या हाती येत आहे. ट्रंप यांनी चीनवर २४५ टक्के टेरीफ आकारताना भारतासाठी जाहीर केलेले २६ टेरीफ ९० दिवसांसाठी स्थगित करण्यात आले आहे. हा भारताच्या कूटनीतीचा विजय आहे.

सध्या टेरीफच्या चिंतेमुळे जगभरातील शेअर बाजार घसरत असताना भारतातील शेअर बाजाराने मोठी उसळी घेतली आहे. भारताचा परकीय चलन साठाही वेगाने वाढून ६७६ अब्ज डॉलर्सच्या पातळीवर पोहोचला आहे. नव्या आर्थिक वर्षातही भारताचा आर्थिक वाढीचा दर जगात सर्वाधिक म्हणजे सहा टक्क्यांपेक्षा अधिक राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

९ एप्रिल रोजी अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी व्हाइट हाऊसमधील पत्रकार परिषदेत सांगितले की, संपूर्ण जगात भारत हा पहिला देश म्हणून पुढे येत आहे जो अमेरिकेबरोबर टेरिफवर प्रभावीपणे संवाद साधत आहे. हे स्पष्ट आहे की ट्रंप यांनी विविध देशांवर पारस्परिक टेरिफ लादल्यानंतर व्यापाराची एक नवी जागतिक संरचना उदयाला आली आहे. ही रचना ट्रम्प यांच्या जागतिक अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे आणि अमेरिकेवरील तथाकथित आर्थिक अन्याय थांबवणे या कथित उद्दिष्टांमुळे आकाराला आली आहे. यामुळे अमेरिकन अर्थव्यवस्था आणि ग्राहकांना त्रास झाला तरीही ट्रम्प यावरुन मागे हटण्यास तयार नाहीयेत.

ही नव्याने उदयाला आलेली व्यापार व्यवस्था पूर्वीच्या बहुपक्षीय व्यापार करारांवर आधारित जागतिक विकासाच्या कल्पनेपासून पूर्णपणे वेगळी आहे. आता संरक्षणवाद आणि द्विपक्षीय व मुक्त व्यापार करार यांचे नवीन पर्व सुरु झाले आहे. त्यामुळे अमेरिकेच्या संरक्षणवादी धोरणांच्या पार्श्वभूमीवर आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपाच्या वास्तवात भारत एका नव्या रणनीतीसह पुढे जात आहे.

भारताच्या दृष्टीने अमेरिका हा अत्यंत महत्त्वाचा देश आहे, कारण गेल्या आर्थिक वर्षात भारताने सुमारे ४३५ अब्ज डॉलर्सच्या उत्पादनांचा निर्यात व्यवहार केला. त्यातील जवळपास १८ टक्के निर्यात केवळ अमेरिकेला झाली आहे. त्यामुळे ट्रंप यांच्या टेरीफ धोरणामुळे भारताची अनेक महत्त्वाचे निर्यात क्षेत्रे प्रभावित होऊ शकतात. यामध्ये आयटी, वस्त्र व परिधान, ऑटोमोबाईल पार्टस, रत्न व दागिने, इलेक्ट्रॉनिक्स, कृषी उत्पादने इत्यादींचा समावेश होतो. भारताच्या औषध आणि सेमीकंडक्टर उद्योगावरही टेरीफची तलवार लटकत आहे.

'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (GTRI)'च्या अहवालानुसार, अमेरिकेने भारतावर २६ टक्के टेरीफ लादल्यास भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत सुमारे ५.७६ अब्ज डॉलर्सची घट होऊ शकते आणि याचा भारताच्या जीडीपीवर ०.२ टक्के नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.

तथापि, ट्रंप यांच्या टेरीफ धोरणात भारतासाठी संधी देखील दडलेल्या आहेत. भारतावर लागू करण्यात आलेले टेरीफ इतर अनेक स्पर्धक देशांच्या तुलनेत कमी असल्यामुळे अमेरिका व इतर बाजारपेठांमध्ये भारतीय निर्यात वाढण्याची शक्यता आहे. तसेच भारत ज्या पद्धतीने अमेरिका व इतर राष्ट्रांबरोबर नवे व्यापार करार करण्यासाठी पावले उचलत आहे, त्यामुळे भारताच्या जागतिक व्यापार व निर्यात क्षमतेत लक्षणीय वाढ होऊ शकते.

भारतावर फिलिपीन्स वगळता एशियातील सर्वात कमी टेरीफ लागू आहे, हे भारतासाठी मॅन्युफॅक्चरींग व जागतिक व्यापारात आपले स्थान बळकट करण्याची सुवर्णसंधी आहे. अमेरिकन बाजारात भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीस अधिक स्पर्धात्मक स्थान प्राप्त होईल. विशेषतः चीन आणि व्हिएतनामच्या तुलनेत भारत चांगल्या स्थितीत आहे. वस्त्र निर्यातीसाठीसुद्धा आता अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. इतर देशांचे उत्पादन अमेरिकेत महाग होऊ लागल्यास भारतीय उत्पादने अधिक मागणीस येऊ शकतात.

जरी सरकारने संसदेत ट्रंपच्या नव्या टेरीफ धोरणाच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करण्याचे आश्वासन दिले असले, तरी उद्योग क्षेत्राने संरक्षणवादाच्या मागे न लपता जागतिक स्पर्धा,

### ● धोरण

संशोधन व विकास यावर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

हे लक्षात घेतले पाहिजे की, १९९१ साली भारतीय उद्योगांना जागतिक स्पर्धेच्या दिशेने वळविणारी उदारीकरणाची रणनीती देशासाठी फायद्याची ठरली. टेरीफ हे स्पर्धेशी संबंधित असतात. त्यामुळे जर आपण त्यांच्या आड लपत राहिलो, तर आपण स्पर्धात्मक बनू शकणार नाही. या नव्या संधींचा पूर्ण लाभ घ्यायचा असेल, तर भारताला 'इज ऑफ डुइंग बिझनेस' सुधारण्यावर भर द्यावा लागेल. लॉजिस्टिक्स व पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करावी लागेल आणि धोरणात्मक स्थैर्य राखले पाहिजे.

ट्रंप यांनी चीनवर लादलेल्या २४५ टक्के टेरीफपासून सुरू झालेले अमेरिका व चीनमधील व्यापार युद्ध भारतासाठी जागतिक आर्थिक संधी आपल्या हातात घेऊन येणार आहे. प्रस्तावित २६ टक्के टेरीफच्या आव्हानाचा सामना करताना, अमेरिका व भारतातील नवा व्यापार करार, विविध देशांबरोबरचे नवे द्विपक्षीय व मुक्त व्यापार करार आणि मजबूत देशांतर्गत आर्थिक घटक हे भारतासाठी प्रभावी आर्थिक शस्त्र म्हणून काम करतील.

केंद्र सरकार भारताला नव्या व्यापार विश्वात एक रचनात्मक शक्ती बनवण्यासाठी अशा रणनीतीने वाटचाल करेल, ज्यात केवळ मोठ्या उद्योगांना नव्हे, तर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना देखील पुरेशा संधी मिळतील. कारण या नव्या डिजिटल युगात 'डिजिटल संपत्ती' या सर्वात मौल्यवान मालमत्तांवरच विकासाची दिशा ठरवली जाणार आहे. त्यामुळे भारताने अशा संपत्तीच्या विकासावर भर द्यायला हवा.

आता मोठ्या भांडवलाच्या उद्योगांना सबसिडी देण्याऐवजी, शिक्षण व कौशल्य विकासामध्ये गुंतवणूक करणे अधिक फायदेशीर ठरेल. भारताने सेवा क्षेत्राला जागतिक स्तरावर एक नवा तेजस्वी राजधानी बनवण्यावर भर द्यायला हवा. त्याचबरोबर अधिकाधिक डिजिटल कौशल्य प्राप्त करण्यावर देखील लक्ष केंद्रित करायला हवे. अशा नव्या आर्थिक आणि द्विपक्षीय जागतिक व्यापार रणनीतीमुळे भारत नव्या व्यापार विश्वाच्या आकाशात एक तेजस्वी, प्रभावशाली आणि सामर्थ्यवान आर्थिक तारा म्हणून झळकू शकेल.

### ● निरीक्षण

## खाद्यसंस्कृतीला 'दहा मिनिटा'चा झटका!

**एिक बर्गर सामान्यपणे वीस मिनिटात तयार होतो आणि त्यास दहा मिनिटाच्या आतच तयार करण्यासाठी पॅटिस किंवा कमी गुणवत्ता असलेल्या खाद्यपदार्थाचा आधार घेतला जातो. या कृतीमुळे केवळ चवीवरच परिणाम होत नाही तर पोषण मूल्य देखील कमी होते. अनेकदा घाईगडबडीत भोजन करताना स्वच्छता पाळली जात नाही आणि त्यामुळे खाद्यपदार्थामुळे आजारपण येण्याची शक्यता असते. देशाला मोठी खाद्यसंस्कृतीची परंपरा असून ती दहा मिनिटात मिळणाऱ्या खाद्यपदार्थातून समजणारी नाही. फूड डिलिव्हरीमुळे खवय्यांची संख्या वाढत असताना दुसरीकडे दर्जाबाबत ग्राहकांनी वेळीच सावध राहणे तितकेच आवश्यक आहे.**

आजच्या वेगवान जगात दहा मिनिटात फूड डिलिव्हरी सेवेने क्रांती घडविली आहे. धावपळीच्या काळात वेळ वाचविण्यासाठी नागरिक डिलिव्हरीच्या सेवेवर अवलंबून राहत आहेत. स्विगी, झोमॅटो आणि अन्य स्टार्टअप्स कंपन्या हायपरलोकल डिलिव्हरीच्या नावावर एखादा खाद्यपदार्थ ग्राहकांना विक्रमी वेळेत पोचण्याची हमी देतात. परंतु ही सुविधा वाटते तेवढी फायद्याची आहे का? दहा मिनिटाच्या डिलिव्हरीत मिळालेला खाद्यपदार्थ कितपत पौष्टिक आणि सकस आहे? जाहीरातबाजीच्या युगात एवढी मोठी गंभीर गोष्ट दुर्लक्षित कशी राहू शकते किंवा त्याच्यावर विचार का केला जात नाही, असा प्रश्न पडतो. एखाद्या रेस्टॉरंटमध्ये दहा मिनिटातच ऑर्डर टेबलवर येते तेव्हा शेफवर किंवा कुकवर संबंधित खाद्यपदार्थ लवकरात लवकर तयार करण्यासाठी एवढा दबाव असतो की त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यायला त्याला वेळच मिळत नाही. फ्रेश भाज्या, साहित्य, स्वच्छता आणि चवही पाहिली जात नाही. उदा. एका बर्गरला तयार होण्यासाठी वीस ते पंचवीस मिनिटे लागतात, मग तो टेबलवर दहा मिनिटातच येतो. ऑर्डर लवकर आल्याने ग्राहक खूश होतो. कारण त्याचा वेळ वाचलेलेला असतो. परंतु हे दहा मिनिटाचे फूड शरीराला अपायकारक ठरू शकते. वेळेत फूड डिलिव्हरी झाली नाही तर त्याच्या नुकसानीचा भार कर्मचाऱ्यांवर टाकला जातो. साहजिकच या कर्मचाऱ्यांना अशक्य वाटणाऱ्या वेळेत ऑर्डर देण्यासाठी दबाव सहन करावा लागतो. रस्त्यावर वेगाने गाडी चालवताना काही प्रसंगी अपघातालाही सामोरे जावे लागते. एका अभ्यासानुसार गेल्या पाच वर्षात भारतात डिलिव्हरी कर्मचाऱ्यांच्या अपघातात तीस टक्के वाढ झाली आहे आणि यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे हायपर फास्ट डिलिव्हरी मॉडेल. याशिवाय संबंधित कर्मचारी कमी वेतनाची, आरोग्य विमा नसणारी आणि टांगती तलवार असलेली नोकरी करत असतात. त्यांच्या मानसिक आणि शारिरीक आरोग्यावर विपरित परिणाम पडतो. वेगाने डिलिव्हरी करण्याचा पर्यावरणावर देखील गंभीर परिणाम होत असतो. डिलिव्हरी वाहनांची संख्या वेगाने वाढत असल्याने साहजिकच कार्बन उत्सर्जन वाढत आहे. याशिवाय दहा मिनिटातच डिलिव्हरी पूर्ण करण्यासाठी लहान सहान ऑर्डर वेगवेगळ्या वाहनांतून पोचवले जातात. प्लॅस्टिक आणि डिस्पोजेल कंटेनर देखील पर्यावरणाला हानी पोचवतात. एका अंदाजानुसार, कंटेनरच्या वापरामुळे भारतात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकचा कचरा निर्माण होतो आणि त्याचा बराचसा वाटा रिसायकल देखील होत नाही. दहा मिनिटांच्या डिलिव्हरी मॉडेलमुळे अशा प्रकारच्या समस्येत आणखीच भर पडताना दिसून येते. कारण घाईगडबडीत डिलिव्हरी करण्याच्या नादात पर्यावरणपूरक पॅकेजिंगकडे लक्ष दिले जात नाही.

दहा मिनिटात ग्राहकांना खाद्यपदार्थ देण्यापोटी फूड ॲप रेस्टॉरंटकडून भरभक्कम कमीशन वसूल करतात. अर्थात लहान आणि स्थानिक रेस्टॉरंट हे अगोदरपासूनच कमी मार्जिनवर काम करत असताना ते एवढ्या कमीशनचा दबाव सहन करू शकत नाहीत. अनेकदा त्यांना किंमत वाढवावी लागते किंवा खाद्यपदार्थाची गुणवत्ता कमी ठेवावी लागते. परिणामी अनेक रेस्टॉरंट बंद पडत आहेत आणि बाजारात ठराविक रेस्टॉरंट साखळीचा दबदबा वाढत चालला आहे. या परिस्थितीमुळे केवळ स्थानिक अर्थव्यवस्थाच नाही तर ग्राहकांचा खाद्यपदार्थांचा पर्याय देखील कमी होताना दिसून येत आहे.

दहा मिनिटांच्या डिलिव्हरीने लोकांच्या खाण्याच्या सवयी बदलल्या आहेत. आता घरी जेवण तयार करणे किंवा बाहेर जाण्याऐवजी लोक डिलिव्हरीचा पर्याय निवडत आहेत. त्यामुळे या सवयीमुळे पारंपरिकपद्धतीने जेवण तयार करण्याची कला धोक्यात आली असून अनेकजण आरोग्यदायी नसलेल्या आहाराकडे वाटचाल करत आहेत. फास्ट फूड, प्रोसेस्ड भोजन तुलनेने लवकर तयार होतात. अर्थात हे मॉडेल लोकांच्या पसंतीस पडत आहे. पण त्याचा दीर्घकालीन प्रभाव लोकांच्या आरोग्यावर पडत असून त्यातूनच लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोगासारख्या समस्या निर्माण होत आहेत. दहा मिनिटांची डिलिव्हरी संपूर्णपणे तंत्रज्ञानावर अवलंबून आहेत. ग्राहकांना सातत्याने ॲपचा वापर करावा लागतो आणि त्यामुळे ग्राहकांचा डेटा ॲपकडे गोळा होत राहतो. यापूर्वी डेटाचा गैरवापर झाल्याचे प्रकरण उघडकीस आलेले आहे आणि ती जोखीमही राहते. शिवाय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आणि निर्णय क्षमताही धोक्यात येत आहे.

भारतात जेवण केवळ पोट भरण्याचे साधन नाही तर ते एक सामाजिक आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. घरात एकाचवेळी सर्वांनी जेवण तयार करणे आणि एकत्र बसून आहार घेणे हे परस्पर संबंध आणि प्रेम वृद्धिंगत होण्यास चालना देते. परंतु दहा मिनिटांच्या डिलिव्हरीने एकत्र जेवण्याची सवय मोडली गेली आहे. रेस्टॉरंटमध्ये जाण्याऐवजी घरीच जेवण मागविण्याची चटक लोकांना लागली असून त्यामुळे सामाजिक संबंध कमी होत चालले आहेत. शिवाय स्थानिक खाद्यपदार्थाऐवजी फास्ट फूड साखळीचे वर्चस्व वाढले असून ते सांस्कृतिक वैविध्यपणाला अडचणीत आणणारे आहे. अर्थात दहा मिनिटांच्या डिलिव्हरीने रोजगार निर्मिती होत असली तरी आर्थिक असमानतेला चालना मिळत आहे. डिलिव्हरी प्लॅटफॉर्म्स आणि गुंतवणूकदार प्रचंड नफा कमावतात. हे मॉडेल काही जणांना अत्याधुनिक सुविधा प्रदान करतात तर समाजातील एका घटकाला त्याचा लाभही मिळत नाही. दहा मिनिटांच्या फूड डिलिव्हरीच्या सुविधेने आपले जीवन सुसह्य झाले असले तरी त्याचे नुकसानही कमी नाही. खाद्यपदार्थाच्या गुणवत्तेपासून पर्यावरण, डिलिव्हरी कर्मचाऱ्यांची सुरक्षा, स्थानिक अर्थव्यवस्थवर या मॉडेलचा नकारात्मक परिणाम होत आहे. पण या गोष्टी खरोखरच आपल्याला एवढ्या घाईत हव्यात का? याचाही विचार करायला हवा. आपण, तुम्ही मी थोडे शांत राहून आरोग्यदायी आणि संतुलीत जीवनशैलीची निवड करू शकतो. सरकार, कंपनी आणि ग्राहकांनी एकत्र येऊन या मॉडेलला आणखी जबाबदार करण्याच्या दृष्टीने काम करायला हवे. फूड डिलिव्हरीत सकस पदार्थ ठेवण्याबरोबरच कर्मचारी आणि ग्राहकांचे हित जोपासल्यास देशातील खाद्यसंस्कृती अबाधित राहिल.

**– अपर्णा देवकर**

### ● ज्ञानकोष

## जागतिक पत्रकारिता स्वातंत्र्य दिन

तीन मे हा दिवस 'जागतिक वृत्तपत्र स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा केला जातो. आफ्रिका खंडातील पत्रकारांनी नामीबियातील विंडहोकमध्ये २८ एप्रिल ते ३ मे १९९१ या कालावधीत झालेल्या परिषदेत वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. माध्यमांचे स्वातंत्र्य, विविधता आणि बाह्य हस्तक्षेपापासून मुक्तता ही तत्त्वे त्याच्या केंद्रस्थानी होती. या दिवसाचे स्मरण म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने १९९८पासून हा दिवस साजरा करण्यास सुरवात केली. त्यानिमित्ताने माध्यमांचे स्वातंत्र्य, पत्रकारांची सुरक्षितता आदी विषयांवर जगभर चर्चा होते. दर वर्षी एखादे मध्यवर्ती सूत्र ठरवून, त्यासंबंधीही विचारमंथन केले जाते. पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न बहुआयामी आहे. केवळ युद्ध किंवा संघर्ष क्षेत्रातच पत्रकारांच्या जीविताला धोका असतो असे नाही.

पत्रकार हे लोकांच्या वतीने व्यवस्थेला प्रश्न विचारत असतात. लोकशाहीचे पहारेकरी किंवा चौथ्या स्तंभाची भूमिका माध्यमे बजावत असताना ज्यांच्या हितसंबंधांना धोका संभवतो, असे घटक विविध मार्गांनी दबाव आणण्याचा प्रयत्न करत असतात. सध्या माध्यमांचे स्वरूप तंत्रज्ञानाच्या अंगानेही बदलले आहे. छापील वृत्तपत्रे ते डिजिटल व्यासपीठे असे त्यांचे स्वरूप बनले आहे. त्यातून सामान्य नागरिकांना परस्परांशी संवाद साधण्याची सोय झाली आहे आणि एकत्रित कृती करण्याची संधीही त्यांना मिळाली आहे. मुख्य प्रवाहातही विधायक व समुदायाधारित पत्रकारितेचे (कम्युनिटी जर्नालिझम) काही प्रयोग आकार घेत आहेत. या दोन्हींचा मेळ साधला, तर नैसर्गिक साधनसामग्रीच्या समन्यायी वाटपापासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततापूर्ण सहजीवनाचे स्वप्न साध्य करण्यासाठी माध्यमांची शक्ती सत्कारणी लागू शकेल.

## पान १ वरुन

**श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी ओझा**

वर्षांपूर्वी संगमनेर श्रमिक पत्रकार संघ असे नामकरण करण्यात आले होते. दरवर्षी महाराष्ट्र दिनापूर्वी संघाची बैठक घेवून नूतन पदाधिकाऱ्यांची निवड आणि वर्षभरातील उपक्रमांचे नियोजन करण्याचा संघटनेचा प्रघात आहे. त्यानुसार या बैठकीत वरीलप्रमाणे नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. विशेष म्हणजे संगमनेरच्या पत्रकारिता क्षेत्रात प्रदीर्घकाळापासून एकसंध राहिलेल्या या संघटनेत आजवर कधीही पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेची आवश्यकता भासलेली नाही. त्यामुळे वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सदस्यांच्या एकमताने निवड करण्याची परंपरा यावेळीही कायम ठेवण्यात आली.

मावळते अध्यक्ष मंगेश सालपे यांनी गेल्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेताना गेल्या वर्षभरात पत्रकारांसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ज्येष्ठ पत्रकार सुनील नवले यांनी माध्यमं क्षेत्रात होणाऱ्या वेगवान बदलांच्या पार्श्वभूमीवर आपल्यातही आवश्यक बदल करण्याची गरज व्यक्त करताना त्यासाठी सातत्याने कार्यशाळा, चर्चासत्र यासारख्या उपक्रमांची गरज व्यक्त केली. संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे कृतिशील संघटन निर्माण झाल्याने पत्रकारांचे प्रश्न, अडचणी सोडवण्यासाठी त्याचा प्रभावी वापर करुन पत्रकारांचे हित जोपासण्यासाठी कार्यरत राहणार असल्याची ग्वाही नूतन अध्यक्ष नितिन ओझा यांनी यावेळी दिली.

नूतन कार्याध्यक्ष संजय आहिरे यांनी संघाच्या संस्थापकांनी निर्माण केलेल्या मापदंडानुसार वर्षभर कामकाज करणार असल्याचे सांगत तंत्रज्ञान क्षेत्राचे ज्ञान अवगत करुन घेण्यासाठी सदस्यांसाठी लवकरच विविध विषयांचा समावेश असलेली कार्यशाळा घेण्याचा मनोदय व्यक्त केला. पत्रकार संघाने सुरु केलेला 'मिट-द-प्रेस' हा अनोखा उपक्रमही अधिक चांगल्या पद्धतीने राबविणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुनील नवले यांच्यासह श्याम तिवारी, सोमनाथ काळे, अमोल मतकर, गोरक्ष नेहे, आनंद गायकवाड, नीलिमा घाडगे, धिरज ठाकूर, अंकुश बुब, बाबासाहेब कडू, सचिन जंत्रे, काशिनाथ गोसावी, भारत रेघाटे, सुशांत पावसे, संजय साबळे आदी उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे शहरातून अभिनंदन होत आहे.

**शिक्षकाची तक्रार केल्याने ग्रामसभा घेवून पालकांनाच धमक्या!**

त्याच जिल्ह्यातील कुरकुंडीची ग्रामपंचायत मात्र 'वतना'च्या मानसिकतेकडे झुकल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. या गावातील जिल्हा परिषदेत शाळेत शिकणाऱ्या आपल्या पाल्यांकडे वर्गशिक्षक दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार काही पालकांनी केली होती. त्याची दखल घेवून कारवाई होणं अपेक्षित असताना गावच्या सरपंचबाईंनी पालक मेळावा घेण्याऐवजी ग्रामसभा बोलावून चक्क तक्रारदार पालकांनाच दमात घेतले. यावेळी ग्रामसभेत हजर असलेल्या काहींनी ठरवून केलेल्या कृतीप्रमाणे 'त्या' सर्व पालकांवर व्यक्तिगत टिपण्णी करीत दहशतही निर्माण केली. त्यातून माहौल बदललेल्या 'कथीत' ग्रामसभेने त्या पालकांकडून बळजबरीने 'माफीनामा' लिहून घेतल्याची तक्रार पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या वृत्ताने तालुक्यात एकच खळबळ उडाली असून संबंधित ग्रामपंचायत जणू आपणांस वतनाप्रमाणे आंदणच मिळाल्याचे समजून गावच्या सरपंच शाईन चौघुले कामकाज करीत असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

याबाबत पालकांच्यावतीने कुरकुंडीतील शम्मा जाकीर पठाण या पालक महिलेने संगमनेर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना तक्रारअर्ज सोपवला आहे. त्यानुसार त्यांचा पाल्य गावातील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता चौथीत शिकतो. सदर शाळेचे मुख्याध्यापक तथा मुलाचे वर्गशिक्षक त्यांच्या मुलाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन त्याला व्यवस्थित शिकवत नाहीत. त्यामुळे त्याची शैक्षणिक प्रगती खुंटून शालेय परीक्षांच्या निकालपत्रकातून वारंवार निराशा हाती येत असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. असा प्रकार केवळ त्यांच्याच पाल्यासोबत घडत नसून अशाप्रकारची तक्रार असलेले गावातील अन्य आठ ते दहा पालक असल्याचा उल्लेखही तक्रारअर्जात करण्यात आला आहे.

शाळेच्या मुख्याध्यापकांबाबत असलेल्या तक्रारींचे निरसन करण्यासाठी पालक मेळावा बोलवावा अशी विनंती गावच्या सरपंच शाईन चौघुले यांच्याकडे केली. मात्र त्यांनी आपल्याच मनमर्जीनुसार शाळेच्या तक्रारींसाठी पालकांशी संवाद साधण्याऐवजी ग्रामसभा बोलावली. या सभेत शाळेतील 'त्या' शिक्षकाबाबत असलेल्या तक्रारीचा ऊहापोह करताना ज्यांचा शाळेशी अथवा त्या संबंधी प्रश्नांशी कोणताही संबंध नाही अशा आठ ते दहा लोकांना जणू पूर्वतयारी केल्याप्रमाणे बोलण्याची संधी दिली गेली. त्यातून त्या लोकांनी चक्क ग्रामसभेत तक्रारदार पालकांवरच प्रश्न उपस्थित करायला सुरुवात केली. यावेळी खुद्‌बुद्दीन पठाण, निसार पठाण, अश्पाक पठाण, परवीन पठाण, तौसिफ पटेल, तुकाराम पवार, पप्पू चौघुले व सरपंच शाईन चौघुले यांनी तक्रारअर्ज मागे घेण्यासाठी दबाव निर्माण केला.

भरसभेत 'महिला बचतगट चालवतात म्हणून आता खूप शहाण्या झाल्या आहेत. यांचे बचतगटच बंद करुन टाका..' अशा दरडावणीच्या स्वरात तक्रारदार पालकांना धमक्या देत महिला सरपंचाच्या समक्ष पालक महिलांचा अपमान करीत पुरुषी मानसिकताही दाखवण्यात आली. त्यामुळे उपस्थित पालकांमध्ये दहशत निर्माण झाल्याचा पूर्वनियोजित फायदा घेत वरील आठ-दहा लोकांच्या गोंधळातून दाखल तक्रारीबाबत पालकांकडून बळजबरीने 'माफीनामा' लिहून घेतला गेला त्यासाठी बदनामी करण्याची धमकीही देण्यात आली.

ग्रामसभेत झालेल्या अपमानानंतर घरी परतलेल्या पालक महिलेने गावातील या हुकूमशाही विरोधात आवाज उठवण्यासाठी संगमनेरच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव घेतली असून या गोष्टीला चार दिवसांचा कालावधी उलटूनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यावरुन गटविकास अधिकारीही कुरकुंडीच्या सरपंचांसह जनतेच्या करातून लाखभर पगार घेणाऱ्या 'त्या' शिक्षकाला पाठीशी घालीत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे तालुक्यात आणि विशेषतः पालक वर्गात संताप निर्माण झाला आहे.

**तरुणाच्या धाडसाने सोनसाखळी चोर पकडला!**

गजबजलेल्या जाणताराजा मैदानाजवळ घडला. याच परिसरातील एका उच्चभ्रु वसाहतीत राहणाऱ्या प्रीती चैतन्य काळे या सायंकाळी साडेसहाच्या सुमारास आपल्या मुलीसह मोपेडवरुन घराकडे जात होत्या. त्याचवेळी नवीन नगररोडकडून येणाऱ्या रस्त्याने पाठीमागून आलेल्या दुचाकीस्वाराने अ‍ॅक्सिस बँकेजवळ सदरील महिलेच्या मोपेडजवळून दुचाकी घेत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र ओरबाडले आणि तो सुसाट वेगाने मालपाणी हॉस्पिटल मार्गाने मालदाडरोडच्या दिशेने दुचाकीसह सुसाट वेगाने गायब झाला.

त्याचवेळी हा प्रकार जाणताराजा मैदानाजवळ आपल्या मित्रासोबत गप्पा मारीत असलेल्या अमित गणेश राठी या तरुणाने बघितला. त्याने क्षणाचाही विलंब न लावता तत्काळ आपल्या दुचाकीवरुन 'त्या' चोरट्याचा पाठलाग सुरु केला आणि जवळपास एक किलोमीटर अंतरावर मालदाडरोडवरील गुप्ता भेळ समोर त्याने त्या चोरट्याची दुचाकी आडवली. त्यावेळी त्या भागातही मोठी गर्दी असल्याने क्षणात तेथे जमाव जमला. संबंधित चोरट्याने एका महिलेचे मंगळसूत्र ओरबाडून पळ काढल्याचे जमावाच्या लक्षात येताच त्यांनी त्याला बेदम मारहाण केली. दरम्यानच्या काळात अमित राठीने शहर पोलिसांनाही खबर दिल्याने काही वेळातच पोलिसांचे वाहनही घटनास्थळी दाखल झाले.

या प्रकरणी सायंकाळी उशिराने प्रीती काळे यांनी फिर्याद दाखल केली. त्यावरुन पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करीत आरोपी आदित्य एकनाथ सोनवणे (मूळ रा.समशेरपूर हल्ली मु.सिन्नर) याला अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून सदरील महिलेच्या गळ्यातून ओरबाडलेले मंगळसूत्रही हस्तगत करण्यात आले असून ते परत करण्यात आले आहे. अटक केलेला आरोपी मूळचा अकोले तालुक्यातील समशेरपूरचा रहिवाशी असून अकोले पोलीस ठाण्यात त्याच्यावर दोन डझनपेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. या घटनेत अमित राठी या तरुणाने धाडसाने पाठलाग करीत नागरिकांच्या मदतीने चोरट्याला जेरबंद केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**देशाच्या विकासात महाराष्ट्राचा मोठा वाटा : माजी मंत्री थोरात**

यशोधन कार्यालय येथे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्री थोरात यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतामध्ये विविधता आहे. विविध जाती, जमाती, समाज हा भारतीय या नावाखाली एकत्र आनंदाने राहतो आहे. लोकशाही व राज्यघटना ही आपली ताकद आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेकांनी हुतात्मे पत्करले. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राची घडी बसवली. शेती, सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास,साहित्य, कला, संस्कृती, औद्योगीकरण, जलसंधारण, विविध पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने मोठी प्रगती केली. आर्थिक समृद्धता निर्माण केली. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये कायम महाराष्ट्राचा वाटा मोठा राहिला आहे.अमृत उद्योग समूहातील थोरात सहकारी साखर कारखाना, राजहंस दूध संघ, अमृतवाहिनी कॉलेज, सह्याद्री शिक्षण संस्था यांसह संगमनेर तालुक्यातील विविध गावे व विविध संस्थांमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

महाराष्ट्र दिनाबरोबर कामगार दिन ही सर्वत्र मोठ्या आनंदाने साजरा होत आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये कायम कामगार व कष्टकरी बंधूंचा मोठा वाटा राहिला आहे. सध्या मात्र जातीभेदाच्या नावावर होणारे राजकारण हे अत्यंत दुर्दैवी असून समतेचा व मानवतेचा महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले.

**महायुती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र प्रगतीकडे : आ. खताळ**

यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संगमनेरचे प्रभारी प्रांताधिकारी विशाल यादव, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, उपविभागीय कृषी अधिकारी विलास गायकवाड, प्रांताधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार श्रीकांत लोमटे,निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, देविदास ढुमणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

आ.अमोल खताळ म्हणाले, महाराष्ट्र गीतातून प्रत्येकाच्या अंगावर शहारे उमटतील एवढी ताकद महाराष्ट्रातील साधुसंतांनी निर्माण केली आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे चांगले निर्णय घेत आहेत.त्यामुळे महाराष्ट्र कधी थांबणार नाही, तो कायमच प्रगतीच्या दिशेनेच वाटचाल करत राहील आणि महाराष्ट्राचे नाव देशात नव्हे तर जगात कसे उज्वल होईल यासाठी सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न राहणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.तहसीलदार धीरज मांजरे यांनी आ. अमोल खताळ यांचे स्वागत केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान झाल्याबद्दल संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांचा आ.अमोल खताळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**माजी आमदार अरुण जगताप यांचे निधन!**

पसरली आहे.

दि.५ एप्रिल रोजी अरुण जगताप यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते.अरुण जगताप यांचे पार्थिव त्यांच्या शहरातील सारस नगर भागातील घरी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी त्यांच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. त्यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता नालेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मागील काही दिवसांपूर्वी अरुण जगताप यांची प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर पुणे येथे खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते.तज्ज्ञ डॉक्टर त्यांच्यावर उपचार करत होते. अखेर उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली.

अरुण जगताप हे नगरच्या राजकारण आणि समाजकारणात काका नावाने परिचित होते.त्यांच्या पश्चात पत्नी पार्वती,मुले राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप,माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले आणि भानुदास कोतकर यांचे ते व्याही होते.अरुण जगताप यांची राजकीय कारकीर्द काँग्रेसमधून सुरू झाली.युवक काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अहमदनगर पालिकेचे नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे.जिल्हा क्रिकेट संघटनेचे ते अध्यक्ष होते.तसेच पुणे आयुर्वेद शैक्षणिक संस्थेचे ते अध्यक्ष होते. अरुण जगताप यांनी अहिल्यानगर शहर मतदारसंघातून दोनदा निवडणूक लढवली होती मात्र त्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसकडून सलग दोनवेळा स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधानपरिषदेवर निवडून गेले होते. त्यांच्या निधनाने अहिल्यानगर शहरवासीयांबरोबर जिल्ह्यातील सामाजिक, राजकीय क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

माजी आमदार अरुण जगताप यांच्या दुःखद निधनानं राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, शिक्षण, सहकार अशा अनेक क्षेत्रात कार्यरत असलेलं, सामान्यांशी घट्ट नाळ जुळलेलं कर्तृत्ववान नेतृत्व हरपलं आहे. तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष, प्रयोगशील शेतकरी, वारकरी संप्रदायाचा सच्चा पाईक म्हणून ते कायम अहिल्यानगरवासियांच्या लक्षात राहतील. त्यांचे निधन ही जिल्ह्याची मोठी हानी असून त्यांच्या निधनाचा धक्का पचवण्याची शक्ती त्यांचे पुत्र आमदार संग्राम जगताप, संपूर्ण जगताप कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांना मिळो अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अरुण जगताप यांच्या विषयी बोलतांना भावना व्यक्त केल्या.

# देवगड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल कामगिरी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील देवगड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवून शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.त्यावेळी मुख्याध्यापिका सुनंदा उगले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.यावेळी बोलतांना त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी जिद्द,चिकाटी आणि सातत्याने मेहनत करत हे यश संपादन केले आहे.शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन व पालकांचा सातत्यपूर्ण पाठिंबा देखील या यशामागील महत्त्वाचा भाग आहे.भविष्यात आमचे विद्यार्थी राज्यस्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करतील,असा आम्हाला विश्वास आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत शिवन्या

योगेश पावसे,ऋतुराज संतोष पावसे,वैष्णवी भगवान शिर्के,जय विजय पावसे,आर्या लहानु भालेराव,प्रगती संदीप पावसे,रणदीप संतोष शिरसाठ आणि मोहम्मद उमर मन्सूर इनामदार या विद्यार्थ्यांनी शाळेतील नियमित सराव परीक्षा,कठोर अभ्यास व शिक्षकांचे तंत्रशुद्ध मार्गदर्शन यांच्या आधारावर हे यश संपादन केले आहे.शाळेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या विशेष उपक्रमांचा आणि अतिरिक्त सराव सत्रांचा यामध्ये मोठा वाटा आहे.शिक्षक मदन माने यांनी विद्यार्थ्यांना मराठी, दिनेश थोरात यांनी गणित व बुद्धिमत्ता, सविता वर्पे यांनी इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन केले.देवगड विद्यालयाने या आधीही विविध शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने यश मिळवले आहे.

# आयुष्यात ठरवलेले ध्येय साकार करा : डॉ. देशपांडे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



स्वतःचा स्वतःवर आत्मविश्वास ठेवा, आपल्या भारतीय संस्कृतीचे मूल्य जपा. भरपूर अभ्यास करा. आयुष्यात ठरवलेले ध्येय साकार करा आणि आपल्या आई-वडिलांना भूषण वाटेल असे समाजाचे आदर्श नागरिक बना असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. अस्मिता देशपांडे यांनी केले.

येथील आय एस ओ प्रमाणित गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सर.डी. एम. पेटिट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता अकरावीच्या यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नुकताच संपन्न झाला त्यावेळी प्राचार्या डॉ. देशपांडे बोलत होत्या. यावेळी प्राचार्या तथा सिन्नर संगमनेर सेंटरच्या अधीक्षिका डॉ. सौ.अस्मिता देशपांडे यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व गुणपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. इयत्ता ११ वी कला व विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून वाणिज्य शाखेचा निकाल ९३.७५ टक्के एवढा लागला आहे. इयत्ता ११ वी विज्ञान शाखेत अर्णव भाऊसाहेब मांढरे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला तर मयुरेश बापू पाटील द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. त्याचप्रमाणे हायस्कूलमध्ये इयत्ता पाचवी ते नववी पर्यंत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे देखील यावेळी अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या यशात पालक व शिक्षक यांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगितले. सर्व विषय शिक्षक, वर्गशिक्षक व इन्चार्ज दशरथ गभाले या सर्वांचे प्राचार्यांनी यावेळी कौतुक केले. यावेळी पर्यवेक्षक ब्राम्हणे, इनचार्ज गभाले, वर्गशिक्षक संजीव शिंदे, अमोल टेमक, रूपाली देशमुख, सुनिता मुरादे, शिल्पा विखे, नलिनी शिंदे, सुशीला चिमणकर, निवेदिता बोराडे, प्रकाश वनम, अमोघ कुलकर्णी, बापू पाटील, ज्येष्ठ लिपिक बाबासाहेब देशमुख, ग्रंथपाल के. के. सांगळे व सर्व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नायक ANCHOR

# रज्जाक शेख यांची वारसा साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी निवड

**नायक वृत्तसेवा, श्रीरामपूर**




जिल्ह्यातील ग्रामीण साहित्यिक रज्जाक शेख यांनी विविध राज्यस्तरीय संमेलनात आपल्या कवितेचे उत्तम सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या दीड हजारापेक्षा जास्त कविता विविध वृत्तपत्र, मासिके व दिवाळी विशेषांकात प्रकाशित झालेल्या आहेत.

रविवार दि.२५ मे रोजी होणाऱ्या वारसा साहित्य मंच मराठवाडा आयोजित छत्रपती संभाजीनगर येथील साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी श्रीरामपूर येथील साहित्यिक रज्जाक शेख यांची बहुमताने निवड करण्यात आली.

रज्जाक शेख यांना स्वागताध्यक्षपदाचे निवडपत्र उद्घाटक साहित्यिक भारत सातपुते(लातूर),वैभव धर्माधिकारी(पुणे),अर्जुन गायकवाड( बीड),नवनाथ शिंदे(अहील्यानगर),पवन शेळके, ज्ञानदेव दिघुळे आणि इतर सर्व कोअर कमिटी यांच्या हस्ते शिर्डी येथे देण्यात आले.या राज्यस्तरीय कवि संमेलनाला नामांकित कवि, कवयित्री उपस्थित राहणार आहेत. रज्जाक शेख यांनी

मनातील भावनांना शब्दबद्ध करून कविता,कथा, लेख, यांचे लेखन तसेच हास्यकविता, लेख, हायकू, अभंग, प्रेमकविता, गझल, काव्यांजली, अष्टाक्षरी, गजल आदी काव्यप्रकारात लेखन केले आहे.

आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन गुजरात, अखिल भारतीय साहित्य संमेलन उस्मानाबाद, नाशिक, वर्धा, अंमळनेर, आखिल भारतीय मुस्लिम साहित्य संमेलन पुणे येथे त्यांच्या कवितांची निवड झाली आहे.

शिरूर येथील राज्यस्तरीय कविसंमेलन, कन्नडचे तिफण संमेलन, श्रीरामपूर येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संमेलन,नेवासा येथील शिवस्वराज्य काव्यसंमेलन,देवगड येथील षटकोळी संमेलन,एक मैफिल कवितांची श्रीगोंदा तसेच बोधी ट्री एज्युकेशन संस्थेच्या कवि संमेलनाचे ते माजी कवी संमेलनाध्यक्ष आहेत.या निवडीबद्दल कै. किसनराव डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पैलवान नानाभाऊ डोंगरे, ग्रामीण कवी आनंदा साळवे, आदर्श शिक्षक देविदास बुधवंत,नितीन गायके, संजय वाघमारे, आत्माराम शेवाळे, चंद्रकांत परदेशी, डॉ. सलीम शेख, अ‍ॅड. मोहन, दिवे आदींनी शेख यांचे अभिनंदन केले आहे.

# महेश पतसंस्थेच्या अध्यक्षपदी सोमाणी तर चांडक उपाध्यक्षपदी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



शहराच्या अर्थकारणाला नवा आयाम देणाऱ्या महेश नागरी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी इंजिनिअर दिनेश सोमाणी तर उपाध्यक्षपदी संतोष चांडक यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहकार खात्याचे अधिकारी राजेंद्र वाकचौरे यांच्या उपस्थितीत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली.

नवनिर्वाचित अध्यक्ष इंजिनिअर दिनेश सोमानी म्हणाले, संस्थेचे संस्थापक स्व. मोहनलाल मणियार यांनी घालून दिलेल्या आर्थिक शिस्त जोपासण्यासह संस्थेला यशाच्या शिखरावर नेऊन सर्वसामान्य छोट्या व्यापाऱ्यांच्या जीवनात आनंद फुलविण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. तसेच उपाध्यक्ष संतोष चांडक यांनी कर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक डॉ. शशिकांत पोफळे यांनी संस्थेचे माजी चेअरमन विशाल नावंदर व व्हा. चेअरमन राजेश लड्डा यांनी संस्थेच्या २०२४-२५ च्या कामकाजाचं कौतुक करताना सांगितले की,ही पतसंस्था शहरातील आर्थिक संस्थांमध्ये आघाडीची संस्था म्हणून गणली जाते. संस्थेला सलग सहा वर्ष बँकिंग क्षेत्रातला उत्कृष्ट समजल्या जाणाऱ्या बँको पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच ३१ मार्च अखेर संस्थेने १२८.३८ कोटी ठेवीचे उद्दिष्ट ओलांडले असून व्यापारी क्षेत्रातील प्रामाणिक व होतकरू कर्जदारांना ९७. ९० कोटी रुपये कर्ज अदा केली आहेत.संस्थेचे थकबाकीचे प्रमाण अगदी नगण्य १.९३ टक्के इतके असून गुंतवणुकीची रक्कम ५३.५९ कोटी, एकूण व्यवसाय २२६.२८ कोटी, तर निव्वळ नफा २.८१ कोटी झाला आहे. यावेळी संचालक विशाल नावंदर, राजेश लड्डा, अनिल अट्टल,डॉ. शशिकांत पोफळे, कैलास सोमाणी, आनंद तापडे ,योगेश जाजू, श्रीकांत मणियार, ज्योती कासट, सरला असावा, निलेश बाहेती,योगेश रहातेकर,मोरेश्वर कोथमिरे,सुदर्शन लाहोटी, जयप्रकाश भुतडा तसेच व्यवस्थापक दिगंबर आडकी उपस्थित होते. दिनेश सोमाणी व संतोष चांडक यांच्या निवडीबद्दल मित्र परिवाराकडून व शहरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.


**पाहिजेत 9850545333**

एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी तात्काळ पाहिजेत

सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)

कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा

पगार - 15000 ते 20000व इतर सवलती

पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर

SR THORAT DAIRY — **पाहिजेत** — GAGANGIRI PACKAGED PURITY

| अ.क्र | पदाचे नाव | जागा | शैक्षणीक पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सेक्युरिटी गार्ड | ५ | अनुभव किमान ५ वर्षे. (Ex-Servicemen preferred) |
| २. | ईटीपी ऑपरेटर | २ | शिक्षण १२वी व पदवीधर अनुभव किमान ४ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ३. | बॉयलर फायरमन | २ | शिक्षण १२वी अनुभव किमान २ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ४. | 1st क्लास बॉयलर ऑपरेटर | २ | अनुभव किमान ५ वर्षे, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ५. | कामगार (पुरुष) | १० | शिक्षण १२वी वय मर्यादा ३० वर्ष |

समक्ष भेटणे – एच.आर. विभागास मुळ कागदपत्रासह रविवार सोडून.
ऑफिस – एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. राजापूर रोड संगमनेर

मोबा. 9860100936/937

E-Mail Id: admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com

MALPANI

प्रोसेस विभागात

**कामगार भरती चालू आहे!**

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,

पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,

नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)

पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व

ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती

सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-

अधिक माहितीसाठी संपर्क

मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी

मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००


'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग अ‍ॅण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# शिवसेना शिंदे गटाच्या सदस्य नोंदणीस प्रारंभ!

## एक लाख सभासद नोंदणी करणार : विनोद सूर्यवंशी



■ आ. अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना शिवकार्य सदस्य नोंदणीसाठी शिवसेना जास्तीत जास्त घरापर्यंत पोहोचेल असे समीर ओझा यांनी सांगितले.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर शहर व तालुक्यातून एक लाख सभासद नोंदणीचा निर्धार आमदार अमोल खताळ यांनी केला असून त्या अनुषंगाने संगमनेर शहरात जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करून देणार असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. डॉ.श्रीकांत शिंदे व आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांनी शहरातील सर्व पदाधिकारी यांच्या वतीने गाव तिथे शिवसेना व घर तिथे शिवसैनिक ही संकल्पना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून सदस्य नोंदणीला सुरुवात करण्यात आली. शहरातील गणेशनगर, जनतानगर, इंदिरानगर अशा उपनगरातून सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात करण्यात आली. 'गाव तिथे शिवसेना,घर तिथे शिवसैनिक'हा उपक्रम राबवुन आ.अमोल खताळ यांच्या वाढदिवसापर्यंत एक लाख सभासद नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे सूर्यवंशी यांनी सांगितले. यावेळी कृष्णा हासे,भूषण नरवडे,सुनित डेरे, सोहम नेवासकर,रोहित जेधे,पप्पू तेजी, किरण पवार, गोलू जेधे, रामभाऊ लहाने,ओम नाकील, अक्षय सस्कर,रोहित रासने,महेश शिंदे, यश डावखरे, कार्तिक तोरकडी,विधेय माने,अवधूत दुर्गुले आदी शहर शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सामाजिक समतेच्या मिसळचा नागरिकांनी घेतला आस्वाद!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एक तालुका एक परिवार ही संकल्पना राज्याला मार्गदर्शक ठरली आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन मोठ्या आनंदाने सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढीसाठी डॉ. जयश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सामाजिक समतेच्या मिसळचा पंधरा हजार नागरिकांनी आस्वाद घेतला. हा अभिनव उपक्रम देशासाठी दिशादर्शक ठरला आहे.

संगमनेर बस स्थानकासमोर नवीन नगर रोड येथे संगमनेर तालुका युवक काँग्रेस व विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने समतेची मिसळ हा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे, उद्योजक राजेश मालपाणी, इंद्रजीत थोरात, गिरीश मालपाणी, आयोजक डॉ. जयश्री थोरात, डॉ. संतोष खेडलेकर यांच्यासह काँग्रेस व संगमनेरमधील ६० पेक्षा जास्त समाजांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर हे सुसंस्कृत आणि वैभवशाली शहर म्हणून ओळखले जाते. अनेक विकासाच्या योजना राबवताना बंधूभावाचे व सुरक्षिततेचे वातावरण हे संगमनेरचे वैशिष्ट्य राहिले असून महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने मानवता धर्म अधिक दृढ व्हावा या उद्देशाने डॉ.जयश्री थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व समाजाने एकत्र येऊन समतेची मिसळ हा उपक्रम केला. यामध्ये विविध समाज बांधवांनी मटकी, पाव, मसाले, ताक, मिरची,पाणी,शेंगदाणे, कैरी, मिठावडा, मठ्ठा, कांदे,टोमॅटो,अशा विविध वस्तू भरभरून दिल्या. शहरातील व तालुक्यातील हजारो नागरिक व महिलांनी मोठ्या आनंदाने एकत्र येऊन या मिसळ पावचा आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना लोकनेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, युवक काँग्रेसच्या पुढाकारातून विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन हा उपक्रम राबवला आहे. यामध्ये भेद नाही, एकता आहे.भारतामध्ये सामाजिक विविधता आहे. मात्र मानवतेचा धर्म अधिक मजबूत होण्यासाठी ही एकत्रित मिसळ आहे. वारकरी धर्मामध्ये जसा काला पवित्र प्रसाद म्हणून घेतला जातो तसा हा एकतेचा संदेश देणारा प्रसाद आहे. यामध्ये कोणताही भेद नाही. समतेचा विचार सांगणारे संत ज्ञानेश्वरांपासून, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर विविध संत व समाज सुधारक हे महाराष्ट्राचे आहे. समतेचा विचार महाराष्ट्राने देशाला दिला आहे. समतेची मिसळ हा उपक्रम एकतेचे प्रतीक असून संपूर्ण देशाला दिशादर्शक असल्याचे सांगताना या उपक्रमाचे कौतुक त्यांनी केले.

डॉ.तांबे म्हणाले की,लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुका हा कायम परिवार म्हणून आहे. काही लोक जाणीवपूर्वक जातीभेद वाढवत आहे. हा जातीभेद नष्ट करण्यासाठी आपण सर्वांनी सातत्याने एकत्र आले पाहिजे. सर्वात पवित्र हा मानव धर्म असून तो जपण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहावे असे आवाहन त्यांनी केले.

डॉ.जयश्री थोरात म्हणाल्या की, महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर, विविध संत व समाजसुधारकांच्या विचारांची व संस्काराची परंपरा आहे. जातीच्या नावावर होणारे राजकारण अत्यंत चुकीचे असून मानवतेचा धर्म हा सर्वात मोठा असून तो जपण्यासाठी समतेची मिसळ हा उपक्रम सर्वांनी मिळून आयोजित केला आहे. यामध्ये शहरातील व तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी पुढाकार घेऊन विविध वस्तू दिल्या आणि त्या एकत्र करून ही समतेची मिसळ बनवली आहे. आपल्याला असेच एकत्र राहायचे आहे. या कार्यक्रमात सर्वांचाच सहभाग असल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. दुर्गा तांबे म्हणाल्या की, सब शहरी एक संगमनेरी ही परंपरा आपल्या विविध उपक्रमांमधून संगमनेर शहर व तालुक्याने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली कायम जपली आहे.यावेळी काँग्रेस, युवक काँग्रेस व विविध युवक संघटनांनी सेवाभावीपणे अत्यंत नम्रपणे काम करताना आलेल्या सर्व संगमनेरकरांचे स्वागत करून त्यांना समतेच्या मिसळचा आस्वाद दिला.



■ महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र धर्म वाढवणारा युवक काँग्रेसचा समतेचा मिसळ हा कार्यक्रम सर्वांनी मिळून यशस्वी केला. यामध्ये विविध समाजाच्या युवकांनी नागरिकांनी पुढाकार घेऊन विविध वस्तू एकत्र करून ही मिसळ केली. तीन हजार डझन पाव व विविध वस्तू असलेल्या या मिसळचा सर्वांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे राज्यभर मोठे कौतुक होत आहे.

■ महाराष्ट्र दिनानिमित्त नवीन नगर रोडवर सकाळपासूनच नागरिक महिला व युवकांची मोठी उपस्थिती या समतेच्या मिसळसाठी होती. यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात,डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्री थोरात, दुर्गा तांबे, इंद्रजीत थोरात या सर्वांनी आलेल्या प्रत्येकाची आवर्जून चौकशी करत सर्वांशी संवाद साधला. डॉ. संतोष खेडलेकर यांनी संगमनेरच्या सामाजिक समतेची परंपरा सर्वांना समजून सांगितली.

# चाँद शहावली बाबांचा ऊर्स तात्पुरता स्थगित

**नायक वृत्तसेवा, राजुर**

अकोले तालुक्यातील राजूर गावात पसरलेल्या कावीळीच्या साथीमुळे ग्रामस्थात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून राजुर ग्रामपंचायतीने जलसुरक्षेच्या तातडीच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत. नुकत्याच पार पडलेल्या नागरिकांच्या मोर्चाला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद देत प्रतिबंधात्मक औषधोपचारांपासून पाणीशुद्धीकरणापर्यंत विविध उपाय सुरू केले आहेत. त्या अनुषंगाने चांद शहावली बाबा उरूस यात्रेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली असून यात्रा एक आठवडा पुढे ढकलण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीने पाणीपुरवठा सुरू केला असून, पाण्याचे नमुने कावीळच्या साथीच्या पार्श्वभूमीवर तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. हे नमुने शुद्ध असल्याचे निष्पन्न झाले असले, तरी खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी पाणी उकळून प्यावे व मेडिक्लोरचा वापर करावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. अंगणवाडी सेविका व आशासेविका घरोघरी जाऊन मेडिक्लोर वाटप करत असून, या मोहिमेवर ग्रामपंचायत प्रशासन स्वतः लक्ष ठेवून आहे.

विशेष म्हणजे, कावीळचा प्रादुर्भाव प्रामुख्याने १० ते २० वयोगटातील मुलांमध्ये अधिक आढळून येत असल्याचे आरोग्य तपासणीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या वयोगटातील मुलांची अधिक काळजी घ्यावी, असे आवाहन पालकांना करण्यात आले आहे.स्थानिक आरोग्य यंत्रणा आणि ग्रामपंचायतीने नागरिकांना प्रशासनाशी सहकार्य करण्याचे, अफवांपासून दूर राहण्याचे आणि स्वच्छतेसाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

गावात काविळीचे रुग्ण वाढत असल्याने चांद शहावली बाबा उरूस यात्रेला तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. ही यात्रा एक आठवडा पुढे ढकलण्यात आली असून, आरोग्याचा धोका पूर्णतः टळल्यानंतरच ती पार पडेल, असे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले आहे.

नायक ANCHOR

# संत गोरा कुंभार वारकरी संप्रदायातील थोर संत : डॉ. विखे



■ जम्मू शहरात प्रजापती कुंभार समाजाचे वास्तव्य आहे. जम्मू शहरातील इंदिरा गांधी चौकात संत गोरोबा कुंभार यांचे भव्य दिव्य मंदिर आहे.जवळ पास ३४ वर्षांपुर्वी ते बांधण्यात आले होते आज तिथे लाखो भाविक नित्याने दर्शन घेत असल्याचे ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर वाकचौरे यांनी सांगितले.

**नायक वृत्तसेवा, आश्वी**

संत गोरा कुंभार हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील एक थोर संत होते. पांडुरंगाचे निस्सीम भक्त असलेल्या गोरोबा काकांचे वीस अभंग आज आपल्याला पहायला मिळतात. संत मंडळींमध्ये संत गोरोबा काका हे 'वडील' होते, संत महात्म्यांना ते परम वंदनीय आणि आदरणीय होते. त्यामुळे सर्व संतांनी त्यांना काका ही उपाधी बहाल केली असल्याचे माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी सांगितले.

संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे संत गोरोबा काका यांची ७०३ वी पुण्यतिथी निमित्याने डॉ सुजय विखे बोलत होते.यावेळी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजय म्हसे,प्रवरा बँकेचे संचालक अजय ब्राम्हणे, संजय गांधी,प्रवरा ग्रामिण शिक्षण संस्थेचे संचालक भाऊसाहेब जऱ्हाड,अँड. रोहीणी निघुते,हरीभाऊ ताजणे,रणजीत गायकवाड,सिताराम वाकचौरे,अण्णासाहेब वाकचौरे,गिताराम वाकचौरे,दत्तात्रय वाकचौरे, चंद्रभान वाकचौरे,योगेश कुलथे यासह महिला पुरूष भाविक उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, गोरोबा काका हे विरागी पुरुष म्हणून ओळखले गेले, निर्गुण निराकार परब्रम्हाचे लौकिक रूप म्हणजे संत गोरा कुंभार. स्वतःचा परंपरागत कुंभार व्यवसाय करीत प्रपंच सांभाळून,संतत्व जपत त्यांनी भागवत धर्माचा प्रसार केला. आलेला दिवस परमेश्वराला स्मरून सार्थकी लावणारा खरा वारकरी असल्याची त्यांची धारणा होती.

श्री कळसेश्वर महाराज | श्री गणेशाय नमः | श्री संत सेना महाराज
ONE CUT WIG CENTRE
काही मिनिटातच तारूण्य अवस्थेतील केस परत मिळवा..
टक्कल पडलेय नो टेन्शन त्यावर आहे आता नवीन ऑप्शन
Before After
ऑपरेशन विना तारुण्यावस्थेतील केस परत मिळवा
₹ 10,000 ₹ 6,999/-
पत्ता - अभंग पेट्रोल पंपासमोर, पेटीट हायस्कुल अकोले रोड, संगमनेर
मो. 9511233837 / 9142255255

दर्शन टेक्सटाईल मार्केट
पिलो | टॉवेल | पडदे | ब्लँकेट
तुमच्या घराला द्या आधुनिक सौंदर्याची अद्भुत झलक
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

28 वर्षांची विश्वासाई परंपरा!
MUTUAL FUNDS Sahi Hai
गुंतवणुकीची प्रत्येक स्टेप तुमच्या आर्थिक स्वप्नपूर्तीकडे
SIP
SYSTEMATIC INVESTMENT PLAN IN EQUITY MUTUAL FUNDS
म्युच्युअल फंड्स, एस.आय.पी., पी.एम.एस., एन.पी.एस., सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन, सिस्टीमॅटीक ट्रान्सफर प्लॅन, टर्म लाईफ इन्शुरन्स, मेडीक्लेम
AMFI Certified म्युच्युअल फंड वितरक
KADLAG INVESTMENT
...Dreams make sense...
HELP LINE : 91503 06306 | 91425 59000
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर

शुभ विवाह महोत्सव
आपल्या लाडक्या मुलीच्या कन्यादाना साठी ८५०००/- रुपयांपासून पुढे भांडी व फर्निचर खरेदी करा
२५०००/- रुपयांचे हनिमून पॅकेजचे मानकरी व्हा ..!
प्रत्येक बस्त्यावर Traveler Bag हमखास मोफत मिळवा.
अगदी कमी ग्राहकांच्या संख्ये मधून मानकरी होता येईल..!
ऑफर कालावधी : २० एप्रिल ते ३० जून पर्यंत लागू.
* नियम व अटी लागू.
जिव्हाळा पांरपरिक... वस्तू अत्याधुनिक ..!
गृह वस्तू भांडार®
• फर्निचर • भांडी • इलेक्ट्रॉनिक्स
शाखा नं. 1 व 2 (IFB Point): बाजारपेठ, संगमनेर । मो. 7719047007
शाखा नं.3 समनापूर गणपती मंदिराजवळ संगमनेर । मो. 9175569966

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५